**Estd. 1962**
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व संलग्नीत महाविद्यालये **(अभियांत्रिकी विद्याशाखा महाविद्यालये वगळून)** यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षेचे जनरल निकाल जाहिर झालेनंतर परीक्षार्थी दंडक 105 व 106 (ब) नुसार गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुनर्गुणपडताळणीसाठी अर्ज करू शकतात. त्यामुळे ज्या परीक्षार्थींना गुणपडताळणी/फोटोकॉपी/ फेरतपासणी/ पुनर्गुणपडताळणी साठी अर्ज करावयाचा आहे त्यांनी सदरचे अर्ज विहित मुदतीत संगणक कार्यप्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरून विद्यापीठास सादर करावयाचे आहे.

**सदरचे अर्ज संगणक कार्यप्रणालीद्वारे ऑनलाईन भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे :-**

1) परीक्षार्थींनी थेट **http://www.unishivaji.ac.in/online_portal** या वेबपेज जाऊन सर्वप्रथम लॉगीन तयार करून आपला गुणपडताळणी/फोटोकॉपी/फेरतपासणी/पुनर्गुणपडताळणीचा अर्ज ऑनलाईन भरून सादर करणेचे आहे.
2) परिक्षार्थी दंडक 105 अन्वये गुणपडताळणीकरिता प्रती सत्र तीन विषयास व दंडक 106 (ब) नुसार फोटोकॉपी मागणीकरिता प्रती सत्र दोन विषयाकरिता अर्ज करू शकेल. फेरतपासणीसाठी अर्ज करण्यापूर्वी त्या विषयाची फोटोकॉपी घेणे आवश्यक आहे.
3) लॉगीन केल्यानंतर परीक्षार्थीस फोटोकॉपी,फेरतपासणी व पुनर्गुणपडताळणी अशा चार वेगळया लिंक दिसतील. परीक्षार्थीला हव्या असलेल्या लिंकवर क्लीक केल्यानंतर ऑनलाईन अर्ज भरता येईल.
4) अर्जांमधील सर्व आवश्यक माहिती भरून विषय निवडून सबमिट केल्यानंतर त्या अर्जास एक क्रमांक मिळेल व त्यानंतर अर्जाची प्रिंट काढून घ्यावी.
5) परीक्षार्थींनी सदर अर्जाची विहित शुल्क **http://www.unishivaji.ac.in/online_portal** या वेबपेजवर देण्यात आलेल्या Pay Fees through ONLINE Link या लिंकमधून खाली नमुद करण्यात आलेल्या बजेड हेडवरती भरावी व चलनाची प्रिंट काढून घ्यावी. याबाबत शुल्क भरण्याबाबतची माहिती **http://www.unishivaji.ac.in/online_portal** या वेबपेजवर Help for Online Payment येथे ठेवण्यात आली आहे.

| अ.क्र. | अर्जाचा प्रकार | बजेड हेड |
|---|---|---|
| 1 | गुणपडताळणी (Verification) | **A.3.R.15** |
| 2 | फेरतपासणी (Revaluation) | |
| 3 | फोटोकॉपी (Photocopy) | **A.3.R.12** |

6) परीक्षार्थींनी अर्ज व शुल्क भरल्यानंतर अर्जाची प्रिंट, ऑनलाईन गुणपत्रकाची प्रत व ऑनलाईन शुल्क भरेलेल्या चलनाची प्रिंट एकत्र जोडून सदचा अर्ज परीक्षा भवन क्र. 2, मध्यवर्ती मूल्यमापन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे तात्काळ जमा करावा.
7) परीक्षार्थींना उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी **(Scan Copy)** **http://www.unishivaji.ac.in/online portal** या वेबपेजवरील विद्यार्थ्यांच्या स्वतः च्या लॉगीनमध्ये **PDF Format** मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.
8) फोटोकॉपी लॉगिनमध्ये प्राप्त झाल्यानंतर परीक्षार्थीनी फेरतपासणी **(Revaluation)** व पुनर्गुणपडताळणी **(Re-Verifaction)** साठी विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरावा व त्याची विहित शुल्क ऑनलाईन भरून सदरचा अर्ज व शुल्क भरलेल्या चलनाची प्रिंट परीक्षा भवन क्र. 2, मध्यवर्ती मूल्यमापन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे तात्काळ जमा करावा.

ऑनलाईन अर्ज भरताना काही शंका/अडचणी असल्यास मध्यवर्ती मूल्यमापन विभागातील 0231–2609316, 2609317 तसेच आय.टी. सेल विभाग 0231–2609335 या दुरध्वनी क्रमांकावरती संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन शुल्क भरताना काही अडचणी उद्‌भल्यास 0231–2609078 या दुरध्वनी क्रमांकावरती संपर्क साधावा.

तेव्हा सदरचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र./शिवाजी वि./परीक्षा/कॅप/फोटोकॉपी/784
दिनांक :– 27 FEB 2023

**प्रति,**

1) मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2) मा.अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
3) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालयास
4) सर्व उपकुलसचिव व सहा. कुलसचिव (परीक्षा विभाग)
5) आय. टी. सेल विभाग
6) लेखा नगदी विभागास
7) इंटरनेट विभागास **(सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे)**